**जिल्हा परिषद, सांगली**
**सामान्य प्रशासन विभाग**
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, सांगली - मिरज मार्ग, पुष्कराज चौक, सांगली, ता. मिरज, जि. सांगली
फोन नं. - ०२३३-२३७२७२५
Email ID - deputyceo@ymail.com & deputyceosangali@gmail.com

**ज्ञापन**

जा.क्र.साप्रवि/सेजेसु/आस्था-११/वशी- २४८ /२०२०
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, सांगली
दिनांक :- ९/०३/२०२०

प्रति,

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा)
जिल्हा परिषद, सांगली

**विषय :- " लघुलेखक उच्च श्रेणी "** या संवर्गाची दिनांकः-०१/०१/२०२०२० रोजीची तात्पुरती सेवा जेष्ठता सुची प्रसिध्द करणे बाबत.

**संदर्भः**- १) महाराष्ट्र शासनाचे सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय- क्रमांक-एसआरव्ही-२०११- प्र.क्र.२८४-१२, दिनांकः-२१/१०/२०११.
२) महाराष्ट्र शासनाचे ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडील निर्णय- क्रमांक-संकीर्ण-१०११-सं.क्र.१७८३-आस्था-१, दिनांकः-२९/१२/२०११.

उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयान्वये सांगली जिल्हा परिषदेकडील सामान्य प्रशासन विभागाचे वर्ग-३ चे " **लघुलेखक उच्च श्रेणी** " या संवर्गातील सर्व कार्यरत कर्मचाऱ्यांची दिनांकः-०१/०१/२०२० रोजीची तात्पूरती सेवा जेष्ठता सूची सांगली जिल्हा परिषदेच्या www.zpsangli.in या संकेतस्थळावर सामान्य प्रशासन विभाग-जेष्ठता यादी या रकान्यामध्ये उपलब्ध करणेत येत असून आपले विभागाचे ईमेल आईडी वर पाठविणेत आलेली आहे.

तरी सदर सुचीची प्रत आपले विभाग / कार्यालयाकडील संबंधित सर्व कर्मचाऱ्यांना निर्दशनास आणून देणेची तसेच सर्व संबंधितांचे सदर सेवा जेष्ठता सुचीमधील अ.क्र., जेष्ठता क्रमांक, कर्मचाऱ्याचे नांव व स्वाक्षरी या नमूऱ्यातील संवर्गनिहाय पोहोच एक प्रत आपले दप्तरी ठेवणेची व दुसरी प्रत या विभागाकडे पाठविणेची कार्यवाही आपले स्तरावरून बिनचुकपणे करणेची आहे. यामध्ये कर्तव्य कसूरी अथवा दिरंगाई होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

सदर सुचीबाबत काहीही हरकती अगर सुचना असलेस सदर ज्ञापनाचे दिनांकापासून १५ दिवसांमध्ये इकडे पाठविणेबाबत तसेच हरकती अगर सुचनांच्या बाबतीत जेष्ठता सुचीमधील क्रमांकासह जेष्ठता सुचीचे विहित नमुन्यामध्ये विहीत पुराव्यांचे साक्षांकित प्रतिसह माहिती पाठविणेबाबत सर्व संबंधित कर्मचाऱ्यांना आपले स्तरावरुन सुचना देणेत याव्यात. सदर मूदतीनंतर येणाऱ्या हरकती अगर सूचनांचा विचार होणार नाही, तसेच संबंधित कर्मचाऱ्यांकडून सदर सुची पाहिली नसलेबाबतचे तक्रारीची नोंदही घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

(राहुल गावडे)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा)
जिल्हा परिषद, सांगली

प्रतः- आस्थापना मेज क्र.१,३ व ७,
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, सांगली.